प्रोप्रा.गायसमुद्रे 9527407701 8459953702
SM
एस.एम गारमेंट
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट अरमानी शेरवानी सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस
एक तासात शिवून मिळतील
बीड रोड, न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701
एक वेळ अवश्य भेट द्या 8459953702

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● रविवार ४ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३५३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
दैनिक वादळ वार्ता
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक, सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक
मो.न.9422660077

# सर्व्हे ने वाढवली भाजपा, संघाची चिंता !

**.संघाचा दबाव वाढला भाजपच्याच नेत्यांनी अजित पवारांवर सिंचन प्रकल्पांमध्ये ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचे आरोप केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही यावरुन अजित पवारांवर शरसंधान साधले होते. त्यानंतर त्याच अजित पवारांशी भाजपने हातमिळवणी केली. यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांची गोची झाली. ज्यांच्याशी तात्त्विक पातळीवर संघर्ष केला, त्यांच्याशीच युती करण्याचा निर्णय भाजप, संघाच्या कार्यकर्त्यांना अनैतिक वाटल्याचे विश्लेषण ऑबझर्व्हर आणि विवेकने केले आहे. भाजपने अजित पवारांसोबतची युती तोडावी यासाठी संघाकडूनच दबाव टाकला जात असल्याची चर्चा आहे.**



**वादळवार्ता/मुंबई**

लोकसभा निवडणुकीतील अपयशानंतर विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीने कंबर कसली आहे. खासकरून भाजपा विधानसभेसाठी जोरदार तयारीला लागली आहे. विधानसभा निवडणुकीतही भाजपाला मोठा बसण्याची घोषणा शक्यता भाजपाच्या अंतर्गत सर्व्हेतून स्पष्ट झाली आहे.या सर्व्हेनुसार भाजपाला केवळ ५५ ते ६० जागाच मिळतील असा निष्कर्ष हाती आला आहे. यामुळे भाजपा आणि संघाच्या चिंतेत भर पडली आहे. भाजपाला लोकसभा निवडणुकीत मोठा फटका बसल्याने विधानसभेसाठी जोरदार तयारी सुरु आहे. त्यातच हा सर्व्हे हाती आला आहे. यासंदर्भात अद्याप कुठलेही अधिकृत भाष्य करण्यात आलेले नसले तरी भाजपा गोटात चिंतेचे वातावरण आहे. लोकसभेतील पराभवानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सातत्याने टीका करत आहे. त्यामुळे भाजपा विधानसभा निवडणुकीआधीच चिंतेत दिसत आहे. भाजपाला २०१४ मध्ये १२२, तर २०१९ मध्ये १०५ जागा मिळाल्या होत्या. आता भाजपाने केलेल्या अंतर्गत सर्व्हेमध्ये २८८ विधानसभा जागांपैकी भाजपला केवळ ५५ ते ६० जागाच जिंकता येतील, असा निष्कर्ष समोर आला आहे. त्यामुळे भाजपच्या वरिष्ठ वर्तुळात चिंतेचे वातावरण पसरले आहे.भाजपाने महाराष्ट्रात सत्ता स्थापन करण्यासाठी बंडखोरी केलेल्या एकनाथ शिंदे यांना सामील करून घेतले. यानंतर अजित पवार यांनी महायुतीत सामील केले. मात्र अजित पवार यांना सोबत घेतल्यामुळे संघ, भाजपाचेकार्यकर्ते नाराज झाले होते. याच पार्श्वभूमीवर आरएसएसचे आजीव सदस्य रतन शारदा यांनी संघाचे मुखपत्र असलेल्या ङ्गऑर्गनायझरफमधील लेखातून भाजपा नेत्यांना लक्ष्य केले होते. भाजपाच्या पराभवाला त्यांचेच राजकारण कारणीभूत ठरल्याचे सांगताना रतन शारदा यांनी महाराष्ट्राचे उदाहरण दिले. महाराष्ट्रात भाजपा आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेनेचे बहुमत असलेले सरकार असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार यांना सोबत घेण्याची काय गरज होती, असा सवाल रतन शारदा यांनी केला होता. अशातच आता भाजपाने अंतर्गत केलेल्या सर्व्हेमुळे पक्षाची चिंता वाढली आहे. गत दोन विधानसभा निवडणुकीत भाजपला १०० हून अधिक जागा जिंकण्यात यश आले आहे. २०१४ आणि २०१९ लोकसभा निवडणुकीतही भाजपने राज्यातील लोकसभेच्या २३ जागा जिंकल्या होत्या. यंदा भाजपची लोकसभेत अत्यंत सुमार कामगिरी राहिली. भाजपने गत दोन्ही निवडणुकीपेक्षा यंदा जास्त जागा लढविल्या. यंदा भाजपने २८ जागांवर उमेदवार उभे केले होते. यातील केवळ नऊ उमेदवारच निवडून आले. तब्बल १९ उमेदवार पराभूत झाले. या धक्क्यातून सावरत भाजपने विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रित केले आहे.लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला १६४ मतदारसंघांमध्ये मोठे लीड मिळाले. महायुतीला १२८ मतदारसंघांमध्येच आघाडी घेता आली. यानंतर महायुतीतील भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने आपल्या आमदारांच्या कामगिरीचे गुप्तपणे सर्वेक्षण सुरू केले आहे. या सर्वेक्षणात जे आमदार निष्क्रिय ठरतील त्यांची तिकिटे विधानसभेला कापली जाणार आहेत. तसेच पर्यायी उमेदवारांचीही नावे काढली जात आहेत.भाजपच्या मदतीने आपण पुन्हा सत्तेत येऊ याची खात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना वाटते. पण भाजपची चिंता अंतर्गत सर्वेक्षणामुळे वाढली आहे. भाजपला विधानसभा निवडणुकीत केवळ ५५ ते ६० जागा मिळू शकतात, असा सर्वेक्षणाचा अंदाज आहे. २०१४ मध्ये भाजपने राज्यात १२२ जागा जिंकल्या तेव्हा ते स्वबळावर लढले होता. २०१९ मध्ये शिवसेनेसोबत युतीत लढलेल्या भाजपने १०५ जाागांपर्यंत मजल मारली होती. यंदा भाजपला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. आता भाजपची सर्व मदार सरकारी योजना आणि मतांच्या ध्रुवीकरणावर आहे.लोकसभेतील कामगिरी पाहता अजित पवार गटात मोठी अस्वस्थता आहे. त्यामुळे त्यांचे अनेक आमदार शरद पवारांकडे जाऊ शकतात. तसे प्रयत्नही अनेकांनी सुरु केले आहेत. लोकसभा निवडणुकीतील कामगिरीमुळे भाजप कार्यकर्त्यांच्या मनोबलावर परिणाम झाला आहे. अजित पवारांसोबतच्या हातमिळवणीचा फटका पक्षाला बसल्याचे, त्यामुळे भाजपची ब्रँड व्हॅल्यू कमी झाल्याचे विश्लेषण संघाशी संबंधित नियतकालिकांनी केलेले आहे. ऑबझर्व्हर आणि विवेकने अजित पवारांसोबतच्या युतीचा भाजपला नेमका कसा फटका बसला, यावर प्रदीर्घ लेख लिहिले आहेत

## कौशल्य, रोजगारासाठी नोंदणी करण्याचे आवाहन

**केज, प्रतिनिधी-**

तहसील कार्यालय केज येथे शुक्रवार रोजी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना बाबत कार्यक्रम घेऊन नोंदणी करण्याचे आवाहन तहसीलदार सचीन देशपांडे यांनी केले नोंदणी करण्याची कार्यपद्धती खालील प्रमाणे असल्याच्या सूचना यावेळी दिल्या सुरुवातीला कोणत्याही ब्राऊजरचा वापर करुन गुगलमध्ये या विभागाचे https://rojgar mahaswayam.gov.in ओपन करावे, वेबपोर्टलवर एम्प्लायर (लिस्ट ए जॉब) हा ऑफान निवडावा. त्यानंतर एम्प्लायर (लिस्ट ए जॉब) हा ऑपान निवडल्यानंतर उजव्या बाजूला Employer Logn चा बॉक्स दिसेल यामध्ये आपला युझर आयडी व पासवर्ड टाकून लॉगइन करावे. पूर्वीची नोदणी नसल्यास आपण खाली असणाऱ्या नोंदणी या टॅब वर क्लिक करून नवीन नोंदणी करावी. लॉगइन केल्यानंतर आपणास डॅशबोर्ड (Dashboard) दिसेल. आपल्या प्रोफाइलमध्ये डाव्या बाजूला पोस्ट व्हेकन्सी (Post Vacancy ) क्लिक करावे. पोस्ट व्हेकन्सी टॅबमधील पहिला पर्याय व्हॅकन्सी टाइप (Vacancy Type) दिसेल यामध्ये आपणांस General, Apprentice, CMYKPY Y Training इ. पर्याय दिसतील. CMYKPY Training या पर्यायावर क्लिक करुन त्याखाली जॉब टायटल/ पदनाम, नोकरीचा प्रकार, रिक्त पदांची एकूण संख्या ( रिक्त पदाची संख्या ही CMYKPY Training योजनेच्या शा.नि.प्रमाणे उदा. शासकीय आस्थापना ५%, खाजगी आस्थापना १०%, खाजगी आस्थापना सेवा क्षेत्र २०% दर्शवाव्यात) रिक्त पदाचे स्वरूप, पद श्रेणी इ. टॅबमध्ये माहिती भरावी. त्यानंतर खाली disclaimer दिसेल त्या सुचना काळजीपूर्वक वाचुन मगच टिक करावे, सर्व अनिवार्य फील्ड भरून पुढील बटणावर क्लिक करावे, पुढे Vacancy हा टेंब असून यामध्ये आपणांस शैक्षणिक अर्हता व कौशल्य इ. माहिती भरावयाची आहे. प्रथम Highest Qualification निवडावे. त्यानंतर Add टॅबचर क्लिक करावे, आपणांस CMYKPY Training करिता ज्या शैक्षणिक पात्रतेचे उमेदवार हवेत तीच शैक्षणिक अर्हत्ता टाकून रोव्ह बटनावर क्लिक करावे, आवश्यक असल्यास कौशल्यामा टॅब भरावा. त्यानंतर Criteria मध्ये वर नमुद केलेले शिक्षण व कौशल्य दिसेल ते Select कराये व Add your Criteria for vacancy यावर करुन Next बटणावर क्लिक करावे. पुढे Reservation हा टेंब असून त्यामध्ये आपल्या पोस्ट करिता सामाजिक प्रवर्गामध्ये सर्व साधारण select करावे तसेच या योजनेसाठी वयोमर्यादा १८ ते ३५ नमुद करावी. पुढील टॅब मध्ये जॉब लोकेशन असून आपल्याला प्रत्यक्ष प्रशिक्षणाचे ठिकाण निवडावे लागेल तसेच उमेदवार कोणत्या जिल्हयातील अपेक्षित आहेत हे देखील नमुद करावे, त्यानंतर Vacancy Validity मध्ये आपण जाहिरात (Vacancy) किमान ५ दिवस उमेदवारांना दिसायी याप्रमाणे तारखा निश्चित कराव्यात व अंतिम दिनांक नमुद करून Save Vacancy करावी, अंतिम दिनांक टाकुन सर्व माहिती योग्य असल्याची खात्री करुन Saved Vacancy publish करावी जेणेकरुन पात्र उमेदवार अर्ज करु शकतील. अशी माहिती श्री देशपांडे यांनी दिली. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंती निमित्त मुख्यमंत्र्यांनी केले अभिवादन



ठाणे, दि.3 :- क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस त्यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाणे येथील निवासस्थानी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

यावेळी नायब तहसिलदार दिनेश पैठणकर हे उपस्थित होते.

## आपला वारसा कुणाचा आहे हे आधी समजून घ्या प्रबोधनाची चळवळ गतिमान करा-सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांचे आवाहन

**अंबाजोगाई/प्रतिनिधी** सर्वकालीन श्रेष्ठ साहित्यिक, लोकशाहीर, बहुजनांचा हुत्कार, साहित्यसम्राट आण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा जागर करीत असताना आण्णा भाऊ साठे प्रेमींनी आपल्याला क्रांतिकारी वस्ताद गुरू लहुजी साळवे, सत्यशोधक महात्मा फुले, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. याची जाणीव असायला पाहिजे असे मत सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा व्याख्याते डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. तसेच प्रबोधनाची चळवळ गतिमान करा असे आवाहन त्यांनी केले. लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त साठे नगर, परळी वेस येथे आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



यावेळी विचारमंचावर माजी आमदार पृथ्विराज साठे, जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, नगरसेवक बबनराव लोमटे, श्रीमती तौर, भाजयुमोचे शहराध्यक्ष संजय गंभिरे, अनिता जोगदंड, सामाजिक कार्यकर्त्या ऍड.शोभाताई सुनिलराव लोमटे, प्रा.डॉ.अनिल नरसिंगे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक बळीराम जोगदंड, डॉ.राहुल धाकडे, भिमसेन लोमटे, संतोष नरसिंगे, संकेत मोदी, शेख मुक्तार तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष पत्रकार संजय जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी साहित्यसम्राट आण्णा भाऊ साठे यांचा गौरवशाली इतिहास अनेक उदाहरणांसह स्पष्ट केला. आपल्या भाषणाने उपस्थित सर्वांची मने जिंकली. आपल्या भाषणात त्यांनी आण्णा भाऊंच्या साहित्यातील प्रत्येक प्रकारांवर चित्रपट निघाले आहेत. इतकं प्रभावी साहित्य आजपर्यंत मराठी साहित्यात झालं नाही हे मत प्रभावीपणे मांडले. आण्णा भाऊंच्या साहित्यातील नायक हा बहुजन आणि शोषित समाजाचे प्रतिनिधित्व करतो व या प्रस्थापित शोषक अन्यायी व्यवस्थेविरूद्ध क्रांतीचा एल्गार पुकारतो. दलित समाजातील फकिराला चित्रपटाचा नायक बनविण्याची ताकद आण्णा भाऊंच्या साहित्यात आहे हे आण्णा भाऊंच साहित्य वाचताना पदोपदी जाणवते असे विचार डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्विराज साठे, सामाजिक कार्यकर्त्या डॉ.अंजलीताई घाडगे, सामाजिक कार्यकर्त्या ऍड.शोभाताई सुनिलराव लोमटे, बळीराम जोगदंड यांनी ही समायोचित मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाहीर मामा काळे यांनी केले. तर अध्यक्षीय समारोप संजय जोगदंड यांनी केला. यावेळी कु.प्रतीक्षा वाघमारे हिचा रयत शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून पदस्थपना झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात शाहीर तुकाराम यमतेकर व इतर कलाकारांचा प्रबोधनपर गीतगायन कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रा.महादेव माने, आयोजक मालू भैय्या जोगदंड, मल्हारी जोगदंड, केशव जोगदंड, माऊली नरसिंगे, राहुल जोगदंड, लखन जोगदंड, गोविंद जोगदंड, शंकर गायकवाड, बालाजी जोगदंड, टोपाजी जोगदंड यांच्यासह अनेकांनी पुढाकार घेतला.

# बीड शहरात घरेलू कामगार महिलांच्या संवाद बैठकीचे आयोजन घरेलू महिला कामगारांच्या सन्मानासाठी ओमप्रकाश गिरी यांचे योगदान

**बीड/प्रतिनिधी**

दिनांक ८ ऑगस्ट २०२४ एम ट्रस्टच्या माध्यमातून बीड शहरातील घरेलू कामगारांच्या संवाद बैठकीचे आयोजन नीलकमल हॉटेल नगर रोड बीड येथे आज ०३ ऑगस्ट २०२४ रोजी करण्यात आले होते. एम ट्रस्ट या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात गेल्या तीन वर्षापासून ऊसतोड कामगार महिला कामगार वीट भट्टी कामगार यांच्यासाठी कार्य करण्यात येत होते व आज घरेलू कामगारांचे विविध प्रश्न समजून घेऊन त्याच्यावर उपाययोजना करण्यासाठी एम ट्रस्टचे जिल्हा समन्वय ओमप्रकाश गिरी यांच्या संकल्पनेतून शहरात घरेलू कामगार म्हणून काम करणाऱ्या हजारो महिलांच्या विकासासाठी घरेलू कामगार महिलांच्या संवाद बैठकीच्या आयोजन करण्यात आले होते सदरील बैठकीसाठी एम ट्रस्ट लखनऊ उत्तर प्रदेश चे प्रमुख संजय राय व महाराष्ट्र राज्य प्रमुख प्रीतू उपाध्याय व एम ट्रस्टचे जिल्हा समन्वयक ओमप्रकाश गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

घरेलू महिला कामगार संवाद बैठकीसाठी बीड शहरातील कानाकोपऱ्यातून धुणे भांडी करणाऱ्या महिला भगिनी यांची उपस्थिती होती. सदरील बैठकीत महाराष्ट्र शासन व केंद्र सरकारच्या घरेलू कामगार मंडळा अंतर्गत लागू असलेल्या योजनेबाबत माहिती देण्यात आली व महिलांनी शासकीय योजनेचा लाभ घेऊन मुलांचे



शिक्षण आरोग्य व कौशल्य आधारित व्यवसायाकडे वळावे यासाठी एम ट्रस्टच्या वतीने महिलांचे संघटन उभा करून त्यांना विविध विषयाबाबत कौशल्य ज्ञान देऊन त्यांना सक्षम करण्यासाठी घरेलू कामगार महिलांचे संघटन उभा करण्यात येत आहे. बैठकीत बोलताना महिलांनी अनेक व्यथा मांडल्या घरकाम करताना छोट्या बालकांना घरी सोडून रोजगारासाठी दिवस दिवस भटकंती करावी लागत आहे. या कामामुळे आरोग्यावर सुद्धा परिणाम होतो मुलांच्या शैक्षणिक खर्च झेपत नसल्यामुळे अनेक बालकांना उच्च शिक्षण देता येत नाही, कौटुंबिक खर्च झेपत नसल्यामुळे घर काम करावे लागते वआम्ही यापुढे यापुढे संघटित होऊन विविध कौशल्य शिकून यावर मात करू असे मत व्यक्त केले. संजय राय यांनी घरेलू कामगारांना मार्गदर्शन करताना आपल्यात असलेल्या छोट्या छोट्या कौशल्याच्या आधारे आपण सक्षम होऊ शकतो. त्यासाठी सामूहिक प्रयत्नाची गरज आहे शिक्षणाची गरज आहे घरेलू कामगारासाठी एम ट्रस्ट विविध उपक्रम जिल्ह्यात राबवून बीड जिल्ह्यातील घरेलू कामगारांचा आदर्श महाराष्ट्रात नव्हे तर देशात निर्माण झाला पाहिजे यासाठी काम करण्याची ग्वाही दिली. एम ट्रस्टचे जिल्हा समन्वयक ओम प्रकाश गिरी यांच्या नेतृत्वात नेहा माळी मनीषा स्वामी यांनी घरेलू कामगारांचे सर्वेक्षण करून शहरातील 1000 पेक्षा जास्त महिलांची नोंदणी करून त्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. यापुढे घरेलू कामगार महिलांचा आवाज म्हणून त्यांच्या न्याय हक्कासाठी सक्षम लढा उभा करण्यासाठी घरेलू कामगारांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी व महिला कामगारांच्या सन्मानासाठी हे जे संघटन उभे केले आहे अत्यंत महत्त्वाचे आहे उपेक्षित वर्गाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हे मोठे पाऊल आहे असे प्रतिपादन संजय राय यांनी केले बैठकीच्या यशस्वीतेसाठी एम ट्रस्टचे बाजीराव गिरी महिला संघटक मनीषा स्वामी,सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब ननावरे, घरेलू कामगार मीडिया प्रमुख बालासाहेब सोलंकर, घरेलू कामगार मित्र नेहा माळी गीता काळे अंजली गिरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अक्षय संतोष ताकमोगे व अक्षय सुभाष काळे यांची प्रशासकीय सेवेत निवड झाल्यामुळे कव्हे गावातून काढली मिरवणूक

**सोलापूर/विश्वास चोपडे**

खरंतर स्पर्धा परीक्षेत यश मिळवणे ही सद्यस्थिती कठीण बाब असली तरी जिद्द असल्यावर हे यश नक्कीच मिळते. हे अक्षय ताकमोगे यांनी दाखवून दिले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेतलेल्या पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) परीक्षेत कव्हे येथील अक्षय संतोष ताकमोगे यांनी यश संपादन केले. त्याचबरोबर अक्षय सुभाष काळे याने जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन (स्थापत्य अभियांत्रिकी सहायक) या पदी निवड झाली त्याच्या या यशाचे कौतुक दिनांक ०२/०८/२०२४ रोजी कव्हे ता माढा येथे फटाक्याच्या आतषबाजीने केले. तसेच जेसीबीतून फुलांची व गुलालाची उजळण करून गावातून मिरवणूक काढली



श्री सिद्धेश्वर ग्रामदैवताचे दर्शन घेतले.

शिक्षणासाठी वडिलांनी घेतलेला कष्टाची जाणीव ठेवत त्याने एम.पी. एस.सी परीक्षेत यश मिळवले त्याचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत तर माध्यमिक शिक्षण प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे येथे झाले उच्च माध्यमिक शिक्षण हे महात्मा ज्योतिबा फुले ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स कुर्डवाडी ता माढा येथे तर श्रीराम कॉलेज ऑफ अग्रिकल्चर पाणीव ता माळशिरस येथे बीएससी ॲग्री म्हणजेच कृषी क्षेत्रात पदवी शिक्षण पूर्ण केले. दरम्यान त्याला स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण झाली त्यानंतर त्याने स्पर्धा परीक्षेची तयारी केली. जनक अभ्यासिका पुणे या ठिकाणी स्पर्धा परीक्षेचा सराव केला.आणि आज हे यश मिळवले त्याला ३२९.५० एवढे गुण मिळाले असून त्याची पीएसआय पदी निवड झाली आहे.

त्याच्या या संघर्षामध्ये वडील भाऊ आण्णा ताकमोगे,विकास ताकमोगे, दत्ता ताकमोगे,व अँड बी. डी. (बाप्पा) पाटील तशेच कुटुंबाचे सहकार्य लाभले. पी.एस.आय. बाळासाहेब ताकमोगे यांच्या प्रोत्साहनामुळे यश मिळवता आले. पी.एस.आय. पदी निवड झाल्याबद्दल कव्हेगावात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. अक्षयच्या यशाबद्दल कव्हे पंचक्रोशीतील नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे. गिरीधर साठे

**टि.सी. हरवला आहे**

प्रांजली विश्वजीत शिंदे रा. अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड येथील रहिवाशी असुन तीचा जीवन प्रगती कनिष्ठ महाविद्यालय नांदुर (घाट) ता.केज १२ वी पासचा टि.सी. दि.३० जुलै २०२४ रोजी अंबाजोगाई ते केज बस प्रवासा दरम्यान हरवला आहे. तरी सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा

मो.न.8329771126

# अखेर दासखेड,कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग सुरू:- डॉ.गणेश ढवळे

**बीड /प्रतिनिधि**

बीड:- पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारतीसाठी २ कोटी ६३ लाख आणि कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारत आणि वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या निवासस्थाना साठी ६ कोटी ३१ लाख रुपये खर्चून सर्व सोयींनी युक्त आरोग्य केंद्र बांधण्यात आली होती. मात्र २ वर्षांपासून बांधकाम पूर्ण झालेले असतानाही शासनाच्या लालफितीत आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने उद्घाटनाच्या प्रतीक्षेत होते. मात्र पंचक्रोशीतील गोरगरीब, कष्टकरी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील रूग्णांची हेळसांड होत असुन त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असुन याबाबत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रे तातडीने सुरू करण्यात यावीत यासाठी दि.१५ ऑगस्ट आगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन डॉ.सरिता हजारे





सहसंचालक आरोग्य सेवा (प्राआकें/ उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांनी घेत जिल्हा आरोग्य आधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना दिले होते. त्या अनुषंगाने डॉ.उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दि.१ ऑगस्ट पासुन दासखेड आणि कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आला असुन रूग्णांची गैरसोय दूर झाली असुन पाटोदा येथे उपचारासाठी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार नाही. प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू झाल्याने रूग्णांची हेळसांड थांबणार ; पिण्याचे पाणी आणि विजेची सोय करावी :-प्रविण शिंदे (दासखेड) दासखेड येथील भुमिपुत्र कृष्णा जाधव हे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे विश्वासू अधिकारी असुन एकनाथ शिंदे आरोग्यमंत्री असताना कृष्णा जाधव ओ.एस.डी. म्हणून काम पहात होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे दासखेड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात येऊन २ कोटी ६३ लाख खर्चून ईमारत बांधण्यात आली मात्र २ वर्षांपासून आरोग्य सुविधा सुरू नव्हती.आता आरोग्य सुविधा सुरू झाल्याने पंचक्रोशीतील रूग्णांची हेळसांड थांबणार आहे. याठिकाणी पिण्याच्या पाण्याची आणि विजेची सोय नाही तेवढ्या त्रुटी आरोग्य विभागाने दुर कराव्यात.

अखेर दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सुविधा सुरू:- डॉ.गणेश ढवळे दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र तब्बल २ कोटी ६३ लाग रूपये खर्चून मुख्य ईमारत सर्व सोयींनी युक्त बांधण्यात आली होती.मात्र २ वर्षांपासून शासनाच्या लालफितीत आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने उद्घाटनाच्या प्रतीक्षेत होते.संबधित प्रकरणी १५ ऑगस्ट रोजी आंदोलनाचा ईशारा दिल्यानंतर डॉ.सारिका हजारे सहसंचालक आरोग्यसेवा ( प्राआकें/ उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांनी निवेदनाची दखल घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्याच्या सुचना दिल्यानंतर डॉ.उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दासखेड आणि कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण सेवा सुरू करण्यात आली असुन वैद्यकीय अधिकारी डॉ.शरयु पडोळे कार्यरत असुन रूग्णांना आरोग्य सेवा देत आहेत. आवश्यक पदभरती झाली असुन बाह्यरुग्ण विभाग सुरू :- डॉ.उल्हास गंडाळ ; जिल्हा आरोग्य अधिकारी बीड दासखेड आणि कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य सहाय्यकांची दोन पदे भरलेली आहेत. क्लार्क ,एएनएम, सफाई कामगार अशा स्वरूपाचा कर्मचारी वर्ग बाह्य स्त्रोताकडुन भरण्यात आलेला असुन दि.१ ऑगस्ट पासुन दोन्ही केंद्रातील बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आलेला असुन पुढील सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येतील.

# पैठण नगरपरिषद कारवाई करत नसल्याने छावा आक्रमक

**पैठण/चैताली औटे**

खाजगी कोचिंग क्लासेसची चौकशी करत नसल्याने अखिल भारतीय छावा संघटना आक्रमक झाली असून आक्रमक आंदोलन आंदोलन करण्याचा इशारा अखिल भारतीय छावा संघटनेचे पैठण शहराध्यक्ष साईनाथ कर्डिले यांनी वेळोवेळी पैठण नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देऊनही कारवाई होत नसल्याने आता पुन्हा एकदा स्मरणपत्र देण्यात आले आहे.

या निवेदनात म्हटले आहे ,की खाजगी कोचिंग क्लासेसच्या जागा अथवा बिल्डिंग ज्या घर मालकाने भाडेतत्त्वावर दिल्या आहेत त्या इमारती कमर्शियल आहेत का? इमारतीत स्वतंत्र पार्किंग व्यवस्था,स्वच्छतागृहे आहे की नाही, व्हेंटीलेशन आणि अग्निशामक दलाचे प्रमाणपत्र आहे का व अग्निशामक दलाचे फायर ऑडिट वेळोवेळी होते का,तथा इमारत परिपूर्ती प्रमाणपत्र आहे का हे तपासले जावे जेणेकरून भविष्यात दिल्ली व कोटा (राजस्थान) सारख्या घटना दुर्दैवाने घडणार नाही. सदरील बाब बघता नगररचना विभाग व अग्निशामक विभागातील कर्मचारी यांचे खाजगी कोचिंग क्लासेस व इमारती मालकाशी लागेबंध असल्याचे दिसून येत असल्याने त्यांची चौकशी करण्यात यावी. अत्यंत लहान सहान जागेमध्ये मध्यवर्ती ठिकाणी हा व्यवसाय केला जातो.रहदारीला अडथळा निर्माण होतो परंतु नगरपरिषद काहीच कारवाई करत नसल्याने स्वतंत्र दिनी आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा शहराध्यक्ष साईनाथ कर्डिले,तालुका अध्यक्ष किशोर सदावर्ते,अडसूळ,अर्जुन खरात, जिजा कर्डिले, चिराग सह आदींनी दिला आहे.





श्रावण महिन्यास सुरुवात होणार आहे. श्रावण महिन्यात मासांहारी जेवण आणि मद्यपान अनेक जण करत नाही. त्यामुळे त्यापूर्वी येणाऱ्या गटारी अमावस्याला पार्टी केली जाते. परंतु हीच दारू पार्टी जीवावर बेतल्याची खळबळकनक घटना समोर आली आहे. ही घटना ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील तानसा धरण क्षेत्रात घडली आहे. या घटनेत पाच जण कारसह वाहून जात होते. त्यातील तिघांनी उड्या मारल्या. परंतु दोन जणांचा मृत्यू झाला. गटारी साजरी करणे त्यांच्या जीवावरच बेतले.

# मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला १४ दिवसांची कोठडी

**पैठण/चैताली औटे**

नुकत्याच पैठण पोलीस ठाण्यात एका अल्पवयीन मुलीवर सतत महिनाभर लैंगिक शोषण करत अत्याचार करणाऱ्या एका दंगेखोरास पैठण पोलिसांनी मुसक्या आवळून आज पैठण न्यायालयात हजर केले असता पैठण न्यायालयाने या समाजकंटकास १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली असून संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात आरोपीची रवानगी करण्यात आली आहे.

याबाबतची थोडक्यात माहिती अशी,की पैठण येथील चिश्तीया कॉलनीत आपल्या शेजारी असलेल्या एका नातेसंबंधातील गरीब अल्पवयीन मुलीवर अलिशान चार चाकीत फिरवून विश्वासात घेऊन नंतर जिवे मारण्याचा धाक दाखवून सतत एक महिनाभर लैंगिक अत्याचार केले.मात्र हे सर्व काही सहनशीलतेच्या पलीकडे गेले तेव्हा आरोपी नामे सय्यद अथर सय्यद नीमोद्दीन खतीब वय वर्षे ४२ रा. चिश्तीया कॉलनी पैठण यावर पैठण पोलीस ठाण्यात पोस्को कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. तेव्हापासून तो पोलिसांना चकवत होता अण्णाभाऊ साठे जयंती मिरवणुकीत आरडाओरडा करून शस्त्राचा धाक दाखवून शांतता भंक करू लागल्याची माहिती पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांना मिळताच घटनास्थळी एक पथक पाठवून सय्यद अथरच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या.

# नांदेड जिल्ह्यात विविध ठिकाणी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

## मारतळा येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व फळांचे वाटप

मारतळा : येथे मनोज पाटील जरांगे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा मारतळा व ग्रामपंचायत कार्यालय मारतळा येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व फळांचे वाटप करण्यात आले. यावेळी भास्कर पाटील ढगे संजय पाटील ढेपे उद्धव पाटील ढेपे सरपंच बालाजी बीचेवाड पत्रकार गणेशराव पाटील ढेपे तिरुपती पाटील येडे तुकाराम पाटील येडे साईनाथ पाटील ढेपे सुरेश पाटील येडे यांच्यासह जिल्हा परिषद शाळेमधील शिक्षक वृंद विद्यार्थी उपस्थित होते

## मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त माहुरात रक्तदान शिबिर व वृक्षारोपण, रुग्णांना फळे वाटप

माहूर - मराठा आरक्षण आंदोलनाचे प्रमुख नेते संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त माहूर ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळे बिस्किटाचे वाटप करण्यात आले तसेच माहूर शहरात सकल मराठा समाजाच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले या शिबिरात ५३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यामध्ये काही मुस्लिम मावळ्यांचाही समावेश आहे तर शहरातील ग्यानबाजी केशवे विद्यालय परिसरात वृक्षारोपण करून मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी माहूर तालुक्यातील व शहरातील बहुसंख्य मराठा कार्यकर्ते उपस्थित होते.नांदेड ब्लड सेंटर रक्तपेढीच्या चमूने रक्त संकलन केले.

## किनवट-गोकुळनगर येथे वृक्षारोपण

किनवट : संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त किनवट तालुक्यातील गोकुळनगर चिखली (बु) येथे ५१ विविध प्रकारच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी चंपतराव मुंगल,दिगांबर कदम,आनंदाराव मुंगल,अर्जुन मुंगल,व्यंकटी पवार ,राम कदम, निरंजन मिराशे, सारंग पवार, किशन मुंगल, आनंदा कदम, आनंदा जाधव,सुरज मुंगल यांच्यासह महिला पुरुष समाज बांधव उपस्थित होते.

**नांदेड प्रतिनिधी** : बालाजी सिरसाट नांदेड : मराठा संघर्ष योद्धा मराठा आरक्षणाचे जनक एक लढवय्या नेता छत्रपती शिवरायांचा मावळा एका सामान्य कुटुंबातून येऊन मागासलेल्या व गरिबीच्या छायेत असणाऱ्या मराठा समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडणारे राजकारणातील मातब्बर नेत्यांना सळोकी पळो करून सोडणारे छत्रपती शिवराय छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती शाहू महाराज यांच्या नंतर समाजाला एकत्रित करून वज्रमुट करणारे मराठा समाजासाठी आपल्या जीवाची परवाना न करता आमरण उपोषण करून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी सरकारला






वेटीस धरून मराठा आरक्षणासाठी गेल्या अनेक वर्षापासून लढा देत असलेले संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस नांदेड जिल्ह्यातील उमरा सर्कल मारतळा, माहूर ,किनवट-गोकुळनगर आदी ठिकाणी शैक्षणिक साहित्याचे वाटप वृक्ष लागवड रुग्णांना फळे वाटप यासह रक्तदान असे विविध उपक्रम घेत मनोज पाटील जरांगे यांचा वाढदिवस सर्व जिल्ह्यातील विविध ठिकाणी साजरा करण्यात आला.यामध्ये मराठा समाज बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# ढगाळ वातावरणात करा सोयाबीन आणि कापसाचे व्यवस्थापन

ढगाळ वातावरण आणि सततच्या पावसामुळे वातावरणातील आर्द्रता वाढते. त्यामुळे पिकांवर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळतो. पावसाळ्यात सततच्या पावसामुळे शेतात साचलेले पाणी हे मूळकुज किंवा मूळसड तसेच पानांवरील, फांद्यावरील बुरशीजन्य रोगांच्या वाढीसाठी कारणीभूत ठरते, त्यामुळे ढगाळ वातावरणात सोयाबीन आणि कापसाचे व्यवस्थापन कसं करायचं याबद्दल शेती अभ्यासक पल्लवी चिंचवडे यांनी शेतकऱ्यांना काही उपाययोजना सुचवल्या आहेत. शेतात साचलेले पाणी सर्व प्रथम त्या शेतातून बाहेर काढण्याची सोय करावी. पाणी बाहेर काढण्यासाठी शेताच्या उताराला आडवे चर खणलेले असावेत. बी बी एफ म्हणजेच रुंद सरी वरंबा पद्धतीने पेरणी केली असेल तर शेतात पाणी साचले तरी देखील मृत सऱ्यांच्या माध्यमातून सहज काढून देता येते. ढगाळ वातावरणामुळे पिक पिवळे पडणे हि देखील मोठी समस्या जाणवते. पिक पिवळे पडण्याचं मुख्य कारण म्हणजे ढगाळ वातावरण आणि सततच्या पावसामुळे पिकांच्या मुळ्या अन्नद्रव्ये शोषून घेऊ शकत नाही त्यामुळे पानांमधील अन्न निर्मितीची प्रक्रिया थांबते. ढगाळ वातावरणामध्ये सोयाबीन आणि कापसामध्ये पाने खाणारी अळी आणि रसशोषक किडींचा अधिक प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते त्यामुळे पावसाची उघडीप पडताच अमील अर्क आणि दशपर्णी अर्क 10 मिली



प्रती लिटर याप्रमाणात घेऊन फवारणी करावी. त्यांनतरची लगेचच आठ दिवसांनी 5% निंबोळी अर्काची फवारणी घेणे आवश्यक आहे. या दोनही फवारणीने फरक वाटत नसेल ग्रीन प्लानेट या कंपनीचे पेस्टो हिट प्लस फवारता येते. पिकावर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाटत असेल तर बायोमिक्स 10 ग्राम प्रती लिटर किंवा लिक्विड स्वरुपात असल्यास 10 मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात घेऊन फवारणी करावी. बायोमिक्सची फवारणी करणे शक्य नसेल तर अशा वेळी विमील अर्क देखील फवारता येते. फवारणी करताना स्टीकरचा वापर करावा जेणेकरून परिणाम अधिक चांगला मिळतो. पिकांच्या जोमदार वाढीसाठी प्रखर सूर्यप्रकाश असणे अत्यंत महत्वाचे आहे. ढगाळ आणि पावसाच्या वातावरणात सूर्यप्रकाश नसल्याने पिकांची वाढ खुंटते आणि पाने पिवळी पडतात. अशा वेळी फवारणी करताना सोबत अमिनो असिडचा वापर करावा. अमिनो असिड बाजारातून विकत न घेता घरीच ईएम 2 सोलुशन वापरून बनवलेला मासा अर्क 10 मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात घेऊन फवारणी केल्यास उत्तम रिझल्ट मिळतात. अमिनो असिड किंवा मासा अर्क ऐवजी कोणतही सीवीड एक्ष्ट्रक्ट देखील वापरता येते. यामुळे पिक पिवळे पडण्याची समस्या कमी होते.

**पल्लवी चिंचवडे : सेंद्रिय शेती अभ्यासक**




वाशी प्रतिनिधी :काल मंत्री महोदय नामदार आमदार तानाजीराव सावंत यांच्या स्वखर्चातून तीन लाख 50 हजार रुपये इतक्या पैशाची डिजिटल टीव्ही जिल्हा परिषद शाळा पारगाव या ठिकाणी देण्यात आली. या ठिकाणी उपस्थित मान्यवर म्हणून पंचायत समिती सदस्य विकास भगवान तळेकर, पारगाव शाखाप्रमुख बाबासाहेब हारे, ग्रामपंचायत सदस्य राजाभाऊ कोळी, सरपंच महेश कोळी, ग्रामपंचायत सदस्य चेतन तातुडे,प्राध्यापक एकनाथ मोठे सर, महेश कोकणे, यासीन शेख, लहू आप्पा चव्हाण,अशोक जाधव, आशाताई कोकणे,व शिवसेना महिला आघाडी च्या सर्व महिला पारगाव इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## केज तालुक्यातील लहुरी या गावचे ओम चाळक यांची उपनिरीक्षक पदी निवड..

**लहुरी/ प्रतिनिधी :-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेच्या माध्यमातून पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाली त्याच्या या निवडीबद्दल कौतुक करत सत्कार करण्यात आला. वडील शेतीचे काम करतात तर आईने शेतीत मोलमजुरी करत मुलाला शिक्षणासाठी पहिली ते चौथी जिल्हा परिषद शाळा लहुरी पाचवी ते सातवी बडे बाबा शाळा विद्यामंदिर लहुरी आठवी ते दहावी योगेश्वरी नूतन विद्यालय अंबाजोगाई अकरावी ते बारावी मुकुंदराज विद्यालय अंबाजोगाई बारावी ते पदवी वसंत महाविद्यालय वसंत महाविद्यालय केज येथे शिक्षण पूर्ण झाले व स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून पुढे जाण्यासाठी प्रेरित केले. त्यांच्या या कष्टाचे चीज आज ओमने करून दाखवले आहे. मुलाला वर्दीमध्ये अधिकारी म्हणून बघण्याचे स्वप्न त्यांनी आज पूर्ण केले आहे. लहुरी गावात त्यांची ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. गावातील सर्व गावकऱ्यांनी ह्या मिरवणुकीत भाग घेतला.पंचक्रोशीतील नागरिकां कडून कौतुक करण्यात येत आहे..



## जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट गैरव्यवहार प्रकरणात एमपीआयडी १९९९ प्रस्तावास लवकरच मान्यता मिळणार - राजेंद्र मस्के

### मुख्य आरोपी अटकेसाठी ठेवीदारांच्या शिष्ट मंडळासह ना. फडणवीसांची भेट घेणार..!

**( बीड प्रतिनिधी )** जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट ठेव रकमेच्या गैरव्यवहार गुन्ह्यातील ठेवीदारांची वित्तीय संस्थामधील हित संबंधांचे संरक्षण अधिनियम एमआयडी 1999 अंतर्गत जिल्हा प्रशासनामार्फत प्रस्ताव शासनाकडे प्रस्तावित आहे. 15 जुलै दरम्यान राज्याचे उप मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस साहेब यांची भेट घेऊन सदरील प्रस्तावास तातडीने मान्यता देऊन अधिसूचनेत प्रसिद्धी द्यावी अशी मागणी ठेवीदारांच्या वतीने केली असून, हा प्रस्ताव मान्यता देण्यासाठी मंत्रालय स्तरावर गृह विभागात तातडीची कार्यवाही चालू आहे. लवकरच या प्रस्तावास राज्य सरकार मान्यता देणार आहे. आवश्यकता वाटल्यास जिजाऊ मल्टीस्टेट ठेवीदार शिष्ट मंडळाची ना. देवेंद्र फडणवीस यांची भेट घालून देणार अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे. जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट बीड बँकेचे अध्यक्षा अनिता बबन शिंदे पती बबन विश्वनाथ शिंदे,अध्यक्षांचे कुटुंबीय, मुख्य कार्यकारी अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमताने ठेवीदारांच्या सुमारे २०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे. या विरोधात पो. स्टे. शिवाजीनगर गु.र.न. ३६०/ २०२३ कलम ४२०,४०६,४०९,३४,१२० (ब) भा.द.वि, सह कलम ३,४ एम आय डी १९९९ प्रमाणे असे तीन गुन्हे बीड पोलिसात व एक गुन्हा धाराशिव जिल्ह्यात दाखल आहे. गुन्ह्यातील आरोपींची स्थावर/ जंगम मालमत्ता महाराष्ट्र ठेवीदारांच्या ( वित्तीय आस्थापने मधील) हित संरक्षण अधिनियम १९९९ अंतर्गत तपशीलवार प्रस्ताव मा. अप्पर पोलीस महासंचालक ( आ. गु. शा.) महाराष्ट्र राज्य मुंबुई यांच्याकडून मा. प्रधान सचिव विशेष गृह विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडे सादर आहे. सदरील प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट गुन्ह्यातील आरोपी व संबंधातील व्यक्तींची मालमत्ता शोधून जप्तीची कारवाई करणे करिता महसूल विभागातील उप जिल्हाधिकारी तत्सम वरिष्ठ अधिकारी नेमून ठेवीदारांची रक्कम परत करणे करिता सरकारकडून प्रयत्न केले जातील. मुख्य आरोपी बबन शिंदे याला अटक करावी व एम आयडी 1999 अंतर्गत गुन्ह्यातील आरोपींची मालमत्ता जप्त करावी. अशी मागणी घेऊन ठेवीदार रस्त्यावर उतरले होते.भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी ठेवीदारांच्या मागणीची दखल घेऊन, राज्याचे गृहमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रस्ताव मंजुरीसाठी दाद मागितली आहे. राजेंद्र मस्के यांच्या प्रयत्नाचे ठेवीदार संघर्ष कृती समितीची मार्गदर्शक अशोक हिंगे, अध्यक्ष ॲड. अप्पासाहेब जगताप, कार्यध्यक्ष डॉ. अरविंद काकडे, मारुती तिपाले, शेख कुतुब भाई, चंद्रकलाताई बांगर, भाऊसाहेब परसे, इंजी सखाराम कळासे, डॉ. उमरजकर, रवींद्र पालीमकर, अच्युत वाघ, आर एस गायकवाड, सूर्यभान नवले, लक्ष्मण हाटवटे, प्रवीण पोपळे, भास्करराव मिसाळ, शहादेव नागरगोजे, सुभाष शिराळे, महेश साळप्पा आदि ठेवीदार बांधवानी आभार व्यक्त केले



## डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपूलाची दुरावस्था; यापुढे एकाही नागरिकाचे रक्त सांडल्यास अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करू- ॲड.मनोज संकाये

**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**


परळी वैजनाथ येथील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपुलाची दुरवस्था झाली असून या पुलावर अनेक नागरिकांचे अपघात होत आहेत येणाऱ्या काळामध्ये एकही अपघात झाला तर संबंधित अधिकाऱ्यावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करू असा गंभीर इशारा सामाजिक कार्यकर्ते ॲड.मनोज संकाये यांनी दिला आहे. पुलावर पडलेल्या खड्ड्याबाबत त्यांनी दिनांक 26 जुलै रोजी प्रशासनास निवेदन आणि विविध दैनिकांमध्ये बातमी प्रसिद्ध केली होती.

निवेदन सादर केल्यानंतर तसेच विविध दैनिकातून बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित विभागाने तात्पुरती रोडची डागडुगी केली. मुरूम टाकून खड्डे बुजवण्यात आले परंतु मागणी मध्ये संबंधित पुलाचे खड्डे डांबरी करण करून



बुजवण्यात यावेत अशी होती परंतु तसे न करता संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्पुरती मलमपट्टी केली. त्याच पुलाच्या वळणावर जेथे पोलीस चौकी आहे तेथेच पुलाचे कटाडे मोडून पडली आहेत त्यामुळे गेल्या काही दिवसापूर्वी दुचाकी वाहन त्या कठाड्यातून जाताना बाल बाल बचावले असे प्रकार सर्रास घडत आहेत त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.

संबंधित नगरपालिका प्रशासन तहसील प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची बोलले असता त्यांच्याकडून मात्र ठोस उत्तर मिळत नाही त्याऐवजी एकमेकाची जबाबदारी ढकलण्यामध्येच अधिकारी मग्न आहेत मग सामान्य माणसाच्या जीवाची परवा नाही का असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत या दिवसांमध्ये या खड्ड्यामध्ये पाणी साठल्यामुळे चिखल होतो आणि वाहने स्लीप होत आहेत. खड्डे बुजवण्यासाठी मोठा मुरूम खड्ड्यांमध्ये टाकला आहे त्यामुळे वाहनधारक पडत आहेत तसेच खड्ड्यांमधील मोठे दगड उडून नागरिकांना इजा पोहोचवत आहेत पर्यायी त्यांना शारीरिक इजा पोहोचत आहे. या सर्व बाबींसाठी कोण जबाबदार आहे याचा तपास संबंधित विभागाने घ्यावा अन्यथा नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



**गेले काही दिवस सातत्याने राज्यात मुसळधार पाऊस कोसळताना दिसत आहे. मुंबईसह कोकण, विदर्भ, सातारा, सांगली या ठिकाणी जोरदार पाऊस होत आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सातारा जिल्ह्यात 1 ते 5 ऑगस्ट यादरम्यान रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. त्या पार्श्वभूमीवर आता सातारा जिल्हा प्रशासनाने, जिल्ह्यातील विविध धबधबे आणि पर्यटनस्थळे बंद ठेवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे.**

# केज व परळी विधानसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा भगव्या सप्ताहाचे आयोजन

**केज/प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशावरून दिनांक 4 ऑगस्ट ते 11 ऑगस्ट 2024 या कालावधीत भगवा सप्ताहाचे आयोजन शिवसेना नेते आमदार सुनीलजी प्रभू साहेब मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर साहेब उपनेत्या माननीय सुषमाताई अंधारे लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनील दादा धांडे सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली केज विधानसभा व परळी विधानसभा मतदारसंघात करण्यात आले आहे..........

सदरील भगवा सप्ताहात शिवसेना प्राथमिक सदस्य नोंदणी अभियान,शिवसेना शाखा उद्घाटन सोहळा,बुथ प्रमुख गट प्रमुख शाखाप्रमुख मेळावे, नवीन मतदार नोंदणी,सह शिवसेना आपल्या दारी अभियान जेष्ठ



शिवसैनिक सत्कार विविध प्रश्नांवर आंदोलन सह अनेक सामाजिक कार्यक्रम आयोजित करून भगवा सप्ताहात राबविण्यात येणार आहेत, येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गाव तिथे शाखा व घर तिथे शिवसैनिक तयार करून, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची ताकद दाखवण्यासाठी मैदानात उतरून पुन्हा एकदा उद्धव साहेबांना मुख्यमंत्री करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणार असे जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांनी माहिती दिली आहे.

# त्यांच्या ढुंXXवर लाथ मारून: मनोज जरांगे पाटील यांचा सरकारच्या शिष्टमंडळाला इशारा काय?

## मग आम्हाला राग येणार नाही का?

**जे निव्वळ मराठा आहेत त्यांना ओबीसीत घेताना सरकारला अडचण होत आहे, असं बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांनी जरांगे यांना सांगितलं. त्यावर, सरकारमधील लोकच सापडलेल्या नोंदी रद्द करा म्हणत आहेत. मग आम्हाला राग येणार नाही का? असा सवाल जरांगे यांनी केला. 57 लाख नोंदी रद्द करा म्हणतात, अशी मागणी कॅबिनेटमध्ये करण्यात आली. म्हणजे मराठयाविषयी तुमची भावना किती वाईट आहे हे दिसून येतं. व्यवसायाच्या आधारावर सगळ्यांना आरक्षण दिलं आहे. मराठा समाजाचा व्यवसाय शेती आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं**

सगेसोयऱ्यांच्या मुद्द्यावर माझी पीएचडी झाली आहे. त्यामुळे तुम्ही कोणताही वकील माझ्यासमोर बसवा आम्हाला कसं आरक्षण मिळत नाही ते सांगा. कुणबी ही मराठ्यांची उपजात आहे. त्यामुळे आम्हाला आऱक्षण दिलंच पाहिजे. नाही तर कुणबी मराठ्यांची उपजात नसल्याचं सिद्ध करा. मग मंडल आयोगही चॅलेंज होईल असं सांगतानाच ज्यांना मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देता येत नाही असं वाटतंय, त्यांच्या ढुंगणावर लाथ मारून त्यांना हाकला, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलंय. मनोज जरांगे पाटील आणि सरकारच्या आमदारांच्या शिष्टमंडळाची जालन्यातील अंतरवली सराटीत चर्चा झाली. यावेळी त्यांनी शिष्टमंडळाला अत्यंत स्पष्ट शब्दात आपली भूमिका सांगितली. कुणबी ओबीसींमध्ये घेतला जातो मग मराठा ओबीसीत का घेतला जात नाही? मिळालेल्या कुणबी नोंदीच्या आधारे मागेल त्या मराठ्याला कुणबी प्रमाणपत्र द्या. मराठा आणि कुणबी एकच आहेत. कुणबी ही मराठ्यांची उपजात आहे. कोणताही वकील बसवा, जर मराठ्यांची उपजात कुणबी नाही तर मग सगळे ओबीसीतून बाहेर काढा अन्यथा मंडल कमिशन चॅलेंज होऊ शकतो, असं मनोज जरांगे पाटील यांनी या शिष्टमंडळाला सुनावलं. म्हणून तुम्हाला मागतोय प्रत्येक पक्ष म्हणतो ओबीसीतून आरक्षण देता येणार नाही, अशी माहिती आमदार राजेंद्र राऊत यांनी यावेळी दिली. त्यावर, त्यांच्या ढुंगणावर लाथ मारून काढून द्या. त्यांनी दिलं नाही म्हणून आम्ही तुम्हाला मागतोय. तुम्ही द्या, असं जरांगे म्हणाले.



## सरकारचा मेळ नाही

**सगे-सोयरे याचाच सरकारला मेळ नाही. आमच्यात आणि कुणबींमध्ये लग्नाच्या सोयरीक होतात, याची नोंद घ्या. आरक्षण देताना आमच्या व्याख्येनुसार आरक्षण दया. आमची व्याख्या सरकारने घेतली पण त्यातून काही शब्द वगळले, अशी नाराजीही त्यांनी व्यक्त केली. आम्हाला राजकारणात ढकलू नका केसेस सगळ्या मागे घ्या. सगळ्या केसेस मागे घेण्याचं आश्वासन सरकारनं आम्हाला दिलं आहे. त्या जाळपोळीच्या घटनेत आमचे लोक नाहीत. जाती दवेषाचा राग असल्याने त्यात आमचे नाव टाकले गेले. आमच्या मागण्या तातडीने पूर्ण करा, असं सांगतानाच आम्हाला राजकारणात जायचं नाही. आम्हाला राजकारणात ढकलू नका, असं आवाहन त्यांनी केलं.**

## गावच्या दोन लेकींचा गावाकऱ्यांनी डीजे वर मिरवणूक काढून केला सन्मान.....!

**हिंगोली :- (प्रतिनिधी)**जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील आजेगाव येथील रहिवाशी असलेल्या पूजा रविप्रसाद अवस्थी व पल्लवी पंजाब वाघ या दोघीनी हलकीच्या पाचवीलाच पुजलेल्या अठराविश्वव दारिद्य मात करत पोलीस भरती मध्ये उत्तीर्ण होऊन गावाकऱ्यांचा व आई वडिलांचे स्वप्न पूर्ण केले आहे. याच दोन लेकींचा गावाकऱ्यांनी डीजे वर मिरवणूक काढून सन्मान केलाय.ही मिरवून गावभर काढून जिल्हा परिषद शाळेत या मुलींचा गावाकऱ्यांनी व शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला आहे. या मिरवणुकीतून इतर मुलींना व मुलांना प्रेरणा मिळावी हा या मागचा उद्देश आहे.विदर्भ व सैन्य व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण अकॅडमी लोणार येथे या मुलींनी पोलीस भरतीची पूर्व तैयेरी केली होती.पुजा आणी पल्लवी यांच्या सोबत एकूण इतर 11 मुलींची निवड पोलीस भरती मध्ये झालीय...पल्लवी वाघ हिची वाशीम येथे निवड झाली तर पुजा वाघ हिची मुंबई येथील मिरभाईंदर येथे निबड झाली....दरम्यान आज काढण्यात आलेल्या मिरवणुकीला गावकरी मोठ्या संखेने उपस्थित होते.



## करचुंडीसह महाराष्ट्रातील गायनधारकांना ७/१२ द्या... अन्यथा गावा गावात मतदानावर बहिष्कार घालू - दीपक केदार

### जयसिंग वीर यांच्या पाठीशी करचुंडी येथील गायनधारक खंबीरपणे हुबे....

**बीड /प्रतिनिधी**

करचुंडी येथील गायनधारक गेल्या पंधरा दिवसा पासून गायरानाचा सातबारा मिळावा यासाठी धरणे आंदोलनाला बसले आहेत. याची दखल घेत ऑल इंडिया पँथर सेनेचे प्रमुख दीपक केदार यांनी धरणे आंदोलन स्थळाला भेट दिली. त्यांनी बोलताना सांगितले करचुंडी सह महाराष्ट्रभर ज्या ज्या गावात गायरान धारक आहेत त्यांच्या नावाने सातबारा करा अन्यथा येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील सर्व गायनधारकांनी मतदानावर बहिष्कार घालावा, त्याही पुढे बोलताना सांगितले जो कोणी मतदान मागायला येईल त्या नेत्याला गाव प्रवेश बंदी करा, स्वातंत्र्याच्या 75 वर्षांतही गायरान हक्कासाठी तमाम करचुंडी सह महाराष्ट्रातला दलित बांधव संघर्ष करत आहे. सत्तेतल्या सरकारला भानावर आणण्यासाठी येणाऱ्या काळात मतदान वर बहिष्कार घालावा असे करचुंडी येथून इथून समस्त महाराष्ट्रातील गायरान धारकांना आव्हान केले आहे. संपूर्ण महाराष्ट्राची गायरान हक्क परिषद करचुडी येथे घेणार अशी घोषणाही त्यांनी केली.याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे नेते पुरुषोत्तम (गोटू )वीर,महाराष्ट्र अध्यक्ष विनोद भोळे,बालाजी जगतकर,जिल्हा अध्यक्ष नितीन सोनावणे,जिल्हा सचिव वसीम शेख, शहर युवा अध्यक्ष अविनाश वडमारे, अनिल वीर, गायरान धरणे आंदोलन आयोजक जयसिंग वीर यांच्यासह दीडशे गायरान धारक या प्रसंगी उपस्थित होते. जिल्हाधिकारी, पालकमंत्री, मुख्यमंत्री, यांच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. अद्यापही जिल्हा प्रशासनाने तहसील प्रशासनाने याआंदोलनाची दखल घेतली नाही किंवा जिल्ह्यातील खासदार, आमदार, भावी आमदार, माजी आमदार यांनी गायरानधारकांच्या आंदोलनास भेट दिली नाही अशी माहिती धरणे आंदोलकांनी दिली आहे.



# जनसंपर्क कक्ष (मुख्यमंत्री सचिवालय) मुंबई महानगरात पोलिसांना पुरेशा सदनिकांसाठी तातडीने प्रस्ताव तयार करा

### वरळी पोलीस वसाहतीतील रहिवाशांच्या समस्या प्राधान्याने दूर करा नियम झुगारणाऱ्या एसआरए विकासकांवर कडक कारवाई करा

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश बीडीडी चाळ पुनर्विकसित इमारतीत दुकानदार, ज्येष्ठ नागरिकांनाही मुख्यमंत्र्यांचा मोठा दिलासा

मुंबई दिनांक ३: पोलीस दिवसरात्र आपले रक्षण करतात पण मुंबईतल्या पोलिसांना राहण्यासाठी घरे नाहीत. आपल्याला पोलिसांसाठी लवचिक भूमिका ठेवावी लागेल, म्हाडा, सिडको, एमएमआरडीए, नगरविकास विभाग यांनी एकत्रितपणे आपल्याला कशा पद्धतीने मुंबई आणि परिसरात पोलिसांसाठी सेवा सदनिका उपलब्ध करून देता येतील ते प्राधान्याने आणि कालबद्ध पद्धतीने ठरवावे असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निर्देश दिले. वरळी येथील पोलीस वसाहतीच्या समस्याही तत्काळ दूर करण्यासाठी आठ दिवसांच्या आत कार्यवाही व्हावी असेही ते म्हणाले. आज महाराष्ट्र निवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासमवेत मुख्यमंत्र्यांची वर्षा येथे बैठक झाली. यावेळी पोलीस वसाहतीतील रहिवासी देखील उपस्थित होते.

पोलिसांना सेवा सदनिका देण्यासंदर्भात कार्यवाही करा

सध्या मुंबईत १८ हजार शासकीय सेवा सदनिका उपलब्ध असून एकूण पोलीस अधिकारी व कर्मचारी ५२ हजार आहेत . केवळ २५ टक्के कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी सदनिका आहेत अशी माहिती पोलीस सह आयुक्त जयकुमार यांनी यावेळी दिली. पोलिसांच्या संख्येच्या तुलनेत ही खूप अपुरी असून बीडीडी चाळीमध्ये ज्या पद्धतीने पोलिसांना मालकी हक्काने सदनिका दिल्या आहेत त्याप्रमाणे मुंबईत इतरत्रही पोलीस कर्मचाऱ्यांना सदनिका कशा देता येतील हे पाहावे. सध्या ज्या ज्या गृहनिर्माण योजना सुरु आहेत त्यात पोलिसांना काही सदनिका राखीव ठेवता येतात का, पुनर्विकसित प्रकल्पांमध्ये प्रोत्साहनपर एफएसआय देता येतो का, तसेच खासगी विकासकांच्या प्रकल्पात सदनिका राखीव ठेवता येतील का याद्दष्टीने तातडीने संबंधित विभागांनी कार्यवाही करावी असेही मुख्यमंत्री म्हणाले.

दंडनीय शुल्काबाबतचा प्रस्ताव तातडीने ठेवा

या बैठकीत वरळी पोलीस वसाहतीतील निवृत्त कर्मचाऱ्यांनी देखील अनुद्येय कालावधी नंतर लावण्यात येणाऱ्या दंडाच्या रकमेविषयी तक्रारी केल्या. १५० रुपये प्रति चौरस फुट असे अवाजवी दंडनीय शुल्क लावले जाते. कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीनंतर ही मोठी रक्कम भरणे शक्य होत नाही. तसेच अनेक अनुकंपा तत्वावरील पोलीस कर्मचाऱ्यांना सदनिका रिकामी करून देण्यास सांगण्यात येते अशा तक्रारी करण्यात आल्या. यावर मुख्यमंत्र्यांनी दंडनीय शुल्काबाबतचा प्रस्ताव आठ दिवसांत शासनाकडे पाठवावा असे निर्देश दिले. अनुकंपा तत्वावरील कर्मचाऱ्यांना सदनिकांतून काढू नका अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

बीडीडी चाळीतील दुकानदारांना दिलासा

बीडीडी चाळींचे पुनर्वसन सुरु असून पूर्वीपासून त्याठिकाणी असलेल्या दुकानदारांनी आपल्याला पुनर्विकसित ठिकाणी वाढीव जागा मिळावी अशी मागणी केली. यासंदर्भात दुकानदार न्यायालयात देखील गेले आहेत. यावेळी मुख्यमंत्र्यांनी या दुकानदारांना वाढीव जागा कशी देता येईल याबाबत नव्या इमारतींच्या आराखड्याचा विचार करून तसा प्रस्ताव तयार करण्यास सांगितले. नव्या पुनर्विकसित इमारतींमध्ये वरिष्ठ नागरिकांना प्राधान्य द्या असेही त्यांनी म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद बोरीकर यांना सांगितले.

....तर एसआरए विकासकांवर कडक कार्यवाही करा

या बैठकीत वरळी येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाच्या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांच्या शिष्टमंडळाने विकासक थकीत भाडे देत नाही , ताबा देत नाही, स्थगिती असूनही कामे सुरु आहेत, वीजेचा पुरवठा नाही, लिफ्ट्स दिलेल्या नाहीत. जुन्या इमारतींची अवस्था वाईट होत असून दुरुस्ती केल्या जात नाही अशा तक्रारी केल्या. गोमाता जनता एसआरए, श्रमिक एकता फेडरेशन, साईबाबा नगर, भांडूप पूर्व येथील साईनगर एसआरए याठिकाणच्या रहिवाशांनी आपल्या व्यथा मुख्यमंत्र्यांना सांगितल्या. यावर मुख्यमंत्र्यांनी नियम झुगारून देणाऱ्या अशा विकासकांवर कडक कार्यवाही करण्याचे तसेच एसआरए इमारतीतील ज्या सदनिका विक्रीसाठी खुल्या आहेत त्यांची विक्री थांबविण्याच्या नोटीसा देण्याचे निर्देशही त्यांनी एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर यांना दिले. इमारतींमध्ये आवश्यक त्या सुविधा आहेत का तसेच किती ठिकाणी दुरुस्तीची गरज आहे ते तातडीने प्रत्यक्ष फिल्डवर अधिकाऱ्यांना पाठवून तपासण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

जळगाव येथील पीएम आवासला गती द्या

या बैठकीत जयप्रकाश बाविस्कर यांनी जळगाव जिल्ह्यातील बुधवड येथे पंतप्रधान आवास योजना रखडली असून त्याला गती देण्याची विनंती केली. मुख्यमंत्र्यांनी गृहनिर्माण अतिरिक्त मुख्य सचिव वल्सा नायर सिंह यांना यासंदर्भात तातडीने कार्यवाही करून ही योजना राबविन्यातले अडथळे दूर करण्याचे निर्देश दिले.

...आणि मुख्यमंत्र्यांनी लावला रेल्वे डीआरएमना फोन

कल्याण ते शिळ रस्त्यावर पलावा समोरील पूल आणि कल्याण येथील पत्री पूल येथे रेल्वेच्या आवश्यक त्या मान्यता मिळालेल्या नाहीत तसेच येथील वाहतूक कोंडी अजूनही सुटत नाही याकडे आमदार राजू पाटील यांनी लक्ष वेधले. मुख्यमंत्र्यांनी यावर बैठकीतूनच मध्य रेल्वेचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक रजनीश कुमार गोयल यांना दूरध्वनी लाऊन याविषयी तातडीने परवानगी देण्याच्या सूचना केल्या. या पुलांच्या जोड रस्त्यांचे कामही तातडीने हाती घ्यावे तसेच येथील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणखी काही पर्यायी रस्ते बांधता अयेतील का हे पाहण्यास त्यांनी एमएसआरडीएचे अनिल गायकवाड यांना सांगितले. कल्याण शिळ फाटा मार्गावरील जमिनी घेतलेल्यांच्या भूसंपादनाचा मोबदला तात्काळ देण्यात यावा असेही निर्देश त्यांनी दिले. काळू धरणाची सद्यस्थिती त्यांनी जाणून घेतली. एक ते दोन महिन्यात मान्यता प्राप्त होतील अशी माहिती जलसंपदा प्रधान सचिव दीपक कपूर यांनी यावेळी दिली.हे धारण पूर्ण झाल्यावर कल्याण डोंबिवली भागालाही चांगला पाणी पुरवठा सुरु होईल असे मुख्यमंत्री म्हणाले. या बैठकीस मनसेचे पदाधिकारी, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, त्याचप्रमाणे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077